| | |
|---|---|
| MHKO110013262022 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र. १७७/२०२२ मधील</u>**<br>**<u>निशाणी क्र. १६ वरील आदेश</u>**<br>**(शरयू पॅकवेल तर्फे प्रोप्रा.श्री.गिरीष मानसिंग सावंत विरुध्द पोलन ॲग्रो मिनरल्स प्रा लि. तर्फे डायरेक्टर श्री.सागर बापू कोपार्डेकर व इतर )** |

प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला" विना कैफीयत ” आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. **(यापुढे त्यांचा उल्लेख सोयीकरीता प्रतिवादी असा करणेत येईल)**

**०२.** प्रतिवादी यांचा अर्ज व त्यावरील वादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले . दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**०३.** प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रस्तुत दावा वादी यांनी प्रतिवादीविरुध्द रक्कम वसुल होवून मिळणेकरीता दाखल केलेला असून सदर कामी प्रस्तुत प्रतिवादी हे हजर झाले व त्यांनी म्हणणे देणेसाठी मुदत घेतली होती . तथापि त्यांनी मुदतीत कैफियत दाखल न केल्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी यांचेविरुध्द दिनांक २० .०१.२०२३ रोजी कैफियत नाही असा आदेश पारीत करणते आला. सबब त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०४.** वादी यांनी निशाणी १७ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे अर्ज चुकीचा व कोणतेही संयुक्तीक कारण नसताना दिलेला आहे. तसेच प्रतिवादी यांनी त्यांचा पत्ता मेमो न दिल्यामुळे सदरचा अर्ज चालणेस पात्र नाही. सबब त्यांनी अर्ज नामंजूर करणेची विनंती केलेली आहे. तसेच अर्ज मंजूर करणेचा झाल्यास रक्कम रुपये पाच हजार दंड करणेची विनंती केलेली आहे.

**०५.** अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता, दिनांक २०.०१.२०२३ रोजी प्रतिवादीविरुध्द कैफियत नाही असा आदेश पारीत करणेत आलेला आहे. प्रस्तुतचा दावा हा रक्कम वसुलीकरीता दाखल करणेत आलेला आहे. अशा परिस्थीतीत दाव्याचे स्वरुप पाहता

दावा गुणदोषावर निकाली होणेकरीता प्रतिवादी यांची कैफियत आवश्यक आहे . प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. प्रतिवादी यांनी आपली कैफियत दाखल करणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे . त्यामुळे प्रतिवादी यांना त्यांनी केलेल्या उशीरासाठी काही अंशी खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**- आ दे श -**

**१)** प्रतिवादी यांचा निशाणी क्र.१६ वरील अर्ज, वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये ५००/-(अक्षरी रुपये पाचशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादी यांना अदा केल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावी.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2023.08.28 11:05:03 +0530

ठिकाण – पेठवडगांव ( एस.डी.शिरसाट )

दिनांक - २५.०८.२०२३ ०२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर. पेठवडगांव